शिक्षण विभाग (प्राथमिक ) जिल्हा परिषद, नांदेड
रेल्वे स्टेशन रोड,जिल्हा व सत्र न्यायालया समोर वजिराबाद, नांदेड
४३१६०१ वेबसाईट - www.zpnanded.in ई-मेल -:
ssananded1@gmail.com

जाक्रं./जिप्रनां/शिअप्रा/प्रा-१९/ 2567 दिनांक- 06 APR 2023

प्रति,
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती सर्व,
जिल्हा, नांदेड

विषय - नांदेड जिल्हा परीषद, शिक्षण विभाग प्राथमिक अंतर्गत अराजपत्रित मुख्याध्यापक,माध्यमिक शिक्षक- मराठी/उर्दू, शारीरीक शिक्षक, चित्रकला शिक्षक, प्रयोगशाळा सहायक, विस्तार अधिकारी शिक्षण इ.संवर्गाची अंतीम सेवाज्येष्ठता यादी-२०२३ अंतीम प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ – १. या कार्यालयाचे पत्र क्रं -३९७ दिनांक -१७.०१.२०२३
२. या कार्यालयाचे पत्र क्रं -४१० दिनांक -१७.०१.२०२३

उपरोक्त विषयानुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, नांदेड जिल्हा परीषद शिक्षण विभाग प्रा अंतर्गत अराजपत्रित मुख्याध्यापक,माध्यमिक शिक्षक- मराठी/उर्दू, शारीरीक शिक्षक, चित्रकला शिक्षक, प्रयोगशाळा सहायक, विस्तार अधिकारी शिक्षण इ. .संवर्गाची प्राथमिक स्वरूपातील सेवाज्येष्ठता यादी दिनांक ०१.०१.२०२३ हा संदर्भ दिनांक लक्षात घेवून संदर्भ क्रं १ व २ नुसार प्रसिध्द करण्यात आली होती .

सदर सर्व संवर्गाची सेवाज्येष्ठता यादी सर्व अधिनिस्त अधिकारी/शिक्षक/कर्मचारी यांचे नजरेस आणून देण्यात येवून यादीतील माहिती बाबत काही आक्षेप व हरकती असल्यास पुराव्या निशी आक्षेप आपल्या स्तरावर संकलीत करून योग्य आक्षेप दुरुस्तीसह अंतीम यादी या कार्यालयास सादर करणे आदेशित करण्यात आले होते. सर्व तालुक्याची यादी संकलीत करण्यात आली असून ती एकत्रित स्वरूपात अंतीम प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर अंतीम स्वरूपातील सेवाजेष्ठता यादी सर्व कर्मचारी यांचे निदर्शनास येणेस्तव पंचायत समिती स्तरावर उपलब्ध करून देणेबाबत कार्यवाही करावी . अतीम सेवाजेष्ठता यादी बाबत काही आक्षेप दुरुस्ती असल्यास या कार्यालयास लेखी स्वरूपात अवगत करावे.

सदर सेवाजेष्ठता यादी जिल्हा परीषद नांदेडचे संकेतस्थळ www. zpnanded.in वर उपलब्ध करण्यात आली आहे.

सोबत –अंतीम सेवाज्येष्ठता यादी-२०२३

(डॉ. सुधीर ठोंबरे),
उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सा
जिल्हा परीषद ,नांदेड.